पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ९

**सभावृत्तांत**

दिनांक - **०१/११/२०१८** वेळ - दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०१/११/२०१८** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.प्रा.सोनाली दत्तात्रय गव्हाणे - सभापती**
२. मा.बाबर शर्मिला राजू - उपसभापती
३. मा.सोनवणे शारदा हिरेन
४. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.जोत्स्ना शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग), श्री.मुंढे – प्र.शिक्षणाधाकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.३) शिक्षण विभागाच्या प्राथमिक शाळांमध्ये बालवाडी व इ.१ ली च्या विद्यार्थ्यांकरीता वर्गामध्ये लहान बेंच(स्कूल डेस्क) ची खरेदी करणेबाबत – मा.संगिता भोंडवे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्राथमिक शाळांमध्ये सध्या असणा-या मानधनावरील सफाई कामगारांचे मानधन वाढविण्याबाबत – मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील बालवाडी शिक्षिकांचे मानधन वाढविणेबाबत – मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव

----------

दिनांक **१९/१०/२०१८** रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०८**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ३६ विषय क्रमांक – ०१
दिनांक - ०१/११/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण
सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.संगिता भोंडवे
संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१/८३४/२०१८, दि.२६/१०/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाअंतर्गत मराठी ,उर्दू, हिंदी, इंग्रजी माध्यमांचया एकूण १०५ शाळा असून या शाळांच्या एकूण ८८ इमारती आहेत तसेच खाजगी शाळा अनुदानीत शाळा कायम विनाअनुदानीत शाळा स्वयंम अनुदानीत शाळा आहेत या शाळांवर नियंत्रण ठेवणेकामी विभागीय पर्यवेक्षक यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांनी प्रत्यक्ष शाळांना भेटी देऊन तयार करण्यात आलेल्या अहवालाचे अवलोकन करणेत आले.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७ विषय क्रमांक – ०२

दिनांक - ०१/११/२०१८ विभाग – प्राथमिक शिक्षण

सुचक : मा.शारदा सोनावणे अनुमोदक : मा.संगिता भोंडवे

संदर्भ :- मा.अतिरिक्त आयुक्त यांचे पत्र जा.क्र.शि.आस्था/१/कावि/८३५/२०१८, दि.२६/१०/२०१८

मा.अतिरिक्त आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभागाचे दिनांक २७/०९/२०१८, दिनांक २९/०९/२०१८, २९/०९/२०१८ शासन निर्णय वाचन व त्याचे अवलोकन करणेत आले.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३८ विषय क्रमांक – ०३

दिनांक - ०१/११/२०१८

सुचक : मा.संगिता भोंडवे अनुमोदक : मा.शर्मिला बाबर

संदर्भ :- मा.संगिता भोंडवे, मा.शर्मिला बाबर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक शाळांमध्ये सद्या मा.महापौर,पिंपरी चिंचवड महानगरपालिका तसेच शिक्षण समिती सदस्य मा.प्रशासन अधिकारी शिक्षण विभाग यांचा शाळा पहाणीदौरा चालू आहे. सदर शाळा पहाणी दौ-यामध्ये मनपा शाळांमधील बालवाडी व इ.१ ली च्या वर्गातील विद्यार्थ्यांना बसण्यासाठी/ लिहिण्यासाठी लहान बेंच नसल्याचे दिसून आले आहे. तसेच याबाबत काही पालकांनी देखील विचारणा केली आहे. याबाबत विद्यार्थ्यासाठी बेंच नसलेने खाली जमीनवर लिहिण्यासाठी पाठीत वाकून लिहावे लागत आहे. तरी याबाबत त्वरीत कार्यवाही करुन एकूण बालवाडी व १ली चे विद्यार्थ्यांसाठी अंदाजे १४,००० लहान बेंच(स्कूल डेस्क) खरेदी करणेकामी त्वरीत कार्यवाही करण्यास मान्यता देणेत आहे.

सदर ठराव सार्वनुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक – ३९ विषय क्रमांक – ०४

दिनांक - ०१/११/२०१८

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.शारदा सोनवणे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये सद्या मानधनावर सफाई कामगार कार्यरत आहेत. सदरचे मानधनावरील सफाई कामगार हे महिना र.रु.२,०००/- या तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत. सध्याच्या महागाईच्या काळामध्ये र.रु.२,०००/-मध्ये कुटूंबाचा उदरनिर्वाह होणे अशक्य

आहे. तरी त्यांच्या मानधनामध्ये शासननिर्णया प्रमाणे किमान वेतन अदा करणेस योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ४० विषय क्रमांक – ०५

दिनांक - ०१/११/२०१८

सुचक : मा.शर्मिला बाबर अनुमोदक : मा.शारदा सोनवणे

संदर्भ :- मा.शर्मिला बाबर , मा.शारदा सोनवणे यांचा प्रस्ताव-

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या एकूण २०६ बालवाडया अंतर्गत २१५ बालवाडी शिक्षीका कार्यरत आहेत. त्या सर्व बालवाडी शिक्षीका सध्या मानधनावर काम करीत आहेत. सदर मानधनावरील बालवाडी शिक्षीका या तुटपुंज्या मानधनावर काम करीत आहेत. सध्याच्या महागाईच्या काळामध्ये हया तुटपुंज्या मानधावर कुटूंबाचा उदरनिर्वाह होणे अशक्य आहे. तरी सदर बालावाडी शिक्षीकांच्या मानधनामध्ये वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(सोनाली दत्तात्रय गव्हाणे)**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७१२/२०१८
दिनांक : ०१/११/२०१८

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.